ग्रं. सं. ठाणें
क्रमांक
१५०७८
२०७/६६०

# भरली चंद्रभागा

REFBK-0011228
REFBK-0011228

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा सोलापूर

नरेश कवडी

# भरली चंद्रभागा

## सोलापूर जिल्ह्यांतील लोकसाहित्य

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 99222

नरेश कवडी

REFBK-0011228
REFBK-0011228

महाराष्ट्र साहित्य परिषद्, शाखा सोलापूर

Bharli Chandrabhaga (Folklore From Sholapur District) Collected & Edited by Naresh Kavadi. Published by Shri S. B. Kulkarni, Karyadhyaksha, Maharashtra Sahitya Parishad, Sholapur Branch, Prabhat Talkies, Sholapur.

प्रथमावृत्ति : फेब्रुवारी १९६०.

पुढील आवृत्तीचे हक्क लेखकाच्या स्वाधीन

मुखपृष्ठ : नरेश कवडी

मूल्य एक रुपया

मुद्रक :
चिंतामण गणेश वझे,
साधना प्रेस,
४३०/३१ शनिवार, पुणें २.

# प्रस्तावना

'भरली चंद्रभागा' या पुस्तकाचे कर्ते श्री. नरेश कवडी, एम्. ए. पीएच्. डी. हे सोलापूरचे वयोवृद्ध राष्ट्रीय कार्यकर्ते श्री. अण्णासाहेब कवडी, वकील यांचे चिरंजीव. या कवि, साहित्यिक पिता-पुत्रांचा आणि आमच्या शाखेचा अनेक वर्षांचा ऋणानुबंध. डॉ. नरेश यांनीं अनेक लोकगीतें प्रयत्नपूर्वक संग्रहित केलीं आहेत. त्यांत सोलापूर शहर, जिल्हा आणि प्रांत परिसरांतीलहि पण बरींच आहेत. आमच्या विनंतीस मान देऊन त्यांनीं आपल्या संग्रहांतून 'भरली चंद्रभागा' हा वैशिष्ट्यपूर्ण लोकगीत-संग्रह महाराष्ट्र–साहित्य परिषद सोलापूर शाखेसाठीं संपादन करून दिला असून, सोलापूर जिल्हा साहित्य संमेलनाच्या करमाळें येथील दहाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्तें त्याचें प्रकाशन होत आहे.

'भरली चंद्रभागा' हें ग्रामीण गीत–संग्रहाचें पुस्तक, सोलापूर म. सा. प. शाखेचें पहिलें अधिकृत पुस्तक म्हणून प्रसिद्ध होत असलें तरी, या प्रसिद्धीचें संपूर्ण श्रेय भारत सरकारचें आहे, हें येथें आम्हीं कृतज्ञतापूर्वक नमूद करीत आहोंत. सोलापूर म. सा. प. शाखेला यंदा भारत सरकारकडून सर्वसामान्य रीत्या ज्या त्या जिल्ह्यांतील विशेष सांस्कृतिक स्वरूपाच्या जुन्या वाङ्मयाच्या प्रकाशनासाठीं म्हणून, ५०० रु. ची पहिली मदत मिळाली. मदतीचें आश्वासन मिळतांच अगदीं सहजसुलभ रीतीनें, अधिकारी साहित्यिकांच्या सहकार्यानें आम्हीं हें पहिलें पुस्तक अत्यंत अल्पावकाशांत प्रसिद्ध करूं शकलों. हें सोलापूर म. सा. प. शाखेचें आमच्या मतें खरें यश होय. अशा महत्त्वाच्या आणि उपयुक्त कार्यासाठीं यापुढेंहि मध्यवर्ती आणि राज्य सरकारांकडून मदत मिळत राहील अशी आम्ही अपेक्षा करतों.

'भरली चंद्रभागा' या पुस्तकाच्या अंतरंगाचा परिचय वाचकांस पुस्तक वाचून होणारच आहे. 'भरली चंद्रभागा' जशी आमच्या सोलापूर जिल्ह्यांतील श्रीक्षेत्र पंढरपुरांत, 'युगे अठ्ठावीस विटेवर उभा' असलेल्या विठ्ठलाच्या संनिध वाहत आहे, तशीच ती लोकवाङ्मय–गंगेच्या स्वरूपांत विशाल महाराष्ट्रांत, जिल्हा तालुक्यापासून खेड्यापर्यंत आजतागायत सर्वत्रच वाहत आली आहे. सोलापूरप्रमाणें महाराष्ट्र साहित्य

परिषदेच्या जिल्हा शाखा सर्वत्र स्थापन होऊन त्या शाखासभांतर्फे जिल्हा ' तालुका ' विभाग संमेलनें सर्वत्र होतील तर, आणि आमच्या नरेश कवडीप्रमाणें ज्या त्या भागांतील साहित्यप्रेमी सार्वजनिक कार्यकर्ते नागरिक आपापल्या आवडीनुसार आपापल्या क्षेत्रपरिसरांतील नव्या जुन्या वाङ्मयाचें संकलन, संपादन करूं शकतील तर, सोलापूर-प्रमाणें अखंड महाराष्ट्रांत आज नाहीं उद्यां मराठी लोक वाङ्मयगंगा आनंदानें इकडे तिकडे चोहीकडे नाचूं बागडूं शकेल. प्रस्तुत प्रकाशन त्या आनंदाचा इसारा ठरो हीच आमची इच्छा !

' भरली चंद्रभागा ' पुस्तक प्रकाशनाला आर्थिक साह्य दिल्याबद्दल भारत सरकारची, प्रस्तुत प्रकाशनाला वाङ्मयीन सहकार्य केल्याबद्दल डॉ. नरेश कवडी यांची आणि पुस्तकाची छपाई शक्य तितक्या सवलतीनें, शक्य तितक्या सुंदर स्वरूपांत वेळेवर करून दिल्याबद्दल साधना प्रेस, पुणें. यांची सोलापूर म. सा. प. शाखा अत्यंत आभारी आहे.

प्रभात टॉकीज सोलापूर<br>१५-२-६०

**शं. गो. पटवर्धन,**<br>अध्यक्ष, म. सा. प. शाखा.

---

टीप :—सोलापूर म. सा. प. शाखा सभा परिचय, परिशिष्ट पाहा.

# दोन शब्द

सोलापूर जिल्ह्यांतल्या लोकसाहित्याची ही वानगी !

जवळजवळ गेलीं पन्नास-साठ वर्षं मराठींत लोकसाहित्याचें प्रकाशन होते आहे, आणि त्याच्या शास्त्रशुद्ध अभ्यासालाहि आकार येत आहे. मराठी लोकसाहित्यांत ओवी विभाग विशेष समृद्ध असल्यानें ओवी वाङ्मयाच्या प्रकाशनाचें कार्य उल्लेखनीय ठरावें हें स्वाभाविक आहे. किंबहुना, आज मराठींत अशी परिस्थिति आहे कीं, ओव्या प्रसिद्ध करतांना पुनरावृत्तीचा दोष येऊं नये अशी खबरदारी घ्यावी लागते. ओव्यांची सार्वत्रिकता हें याचें कारण आहे. त्या मानानें गाणीं, उखाणें, म्हणीं यांत प्रादेशिकता अधिक दिसते. परंतु त्यांत काव्यमयता कमी असल्यानें प्रकाशकाला त्यांचें आकर्षण कमी वाटतें. प्रस्तुत संग्रहांत उखाणे, म्हणीं, गाणीं समाविष्ट केलेलीं असून नाविन्यावर अधिक भर दिला आहे.

लोकसाहित्याच्या प्रकाशनांतलें केवळ नाविन्यजन्य कौतुक आतां कमी झालें असून शास्त्रीय अभ्यासाकडे अधिकाधिक लक्ष वळूं लागलें आहे. या दृष्टीनें संग्रहकारांनींहि आपल्या जवळचें साहित्य प्रकाशित करतांना कांहीं पद्धत ठेवणें आवश्यक आहे. जिल्हानिहाय आणि जातिनिहाय असें साहित्य प्रकाशित केल्यास अभ्यासकांना अधिक निश्चित स्वरूपाचे निष्कर्ष काढणें सोपें जाईल असें वाटतें. म्हणून या संग्रहांत फक्त सोलापूर जिल्ह्यांतलें लोकसाहित्य घेतलें आहे. मुख्यतः सोलापूर, पंढरपूर, करमाळें, कुर्डूवाडी, बेगमपूर, जेऊर या गांवांतून हें साहित्य गोळा केलें आहे, आणि भाषिक दृष्ट्या दोन्ही थरांतलें आहे. अर्थात्, एकाच विषयावरील दोन्ही थरांतलीं गाणीं देतांना तीं वेगळीं वेगळीं दिलीं आहेत.

लोककाव्याच्या दीर्घ परंपरेमुळें अप्रचलित शब्द, जुनीं रूपें या दृष्टीनें त्याला भाषिक महत्त्व आहे. तथापि त्यामुळेंच चालू लोकभाषेचीं वैशिष्ट्यें त्यांत कमी दिसतात. प्रस्तुत संग्रहांत ‘ बंदू वळकला ’ ( बंधूनें ओळखलें ), ‘ धाबळी वरी पसरिला ’ ( त्यानें वर धाबळी पसरली ) किंवा ‘ बुक्कया लावीन ’ ( बुक्कया मारीन ) यासारख्या ओळींतून सोलापूरच्या लोकभाषेचीं

कांहीं वैशिष्ट्यें प्रकट झालीं आहेत. तथापि हीं उदाहरणें फार नाहींत.

सोलापूर जिल्ह्यांतल्या लोककाव्याची ही ' भरली चंद्रभागा ' रसिकांना व अभ्यासकांना आवडेल अशी आशा आहे.

## आभार

आठ-नऊ वर्षांपूर्वीं जमविलेलें हें साहित्य कधींकाळीं प्रकाशांत येईल अशी कल्पना नव्हती. तें प्रकाशित करण्याचें श्रेय घेतल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषदेची सोलापूर शाखा आणि तिचे अध्यक्ष श्री. शं. गो. पटवर्धन यांचा मी फार आभारी आहें.

साहित्य जमा करण्याच्या कामीं माझी आई सौ. आनंदीबाई, भावजय सौ. इंदिरा व पत्नी सौ. कुसुमावती या तिघींनींहि साह्य केलें आहे. त्याचप्रमाणें सोलापूरचे माझे मित्र श्री. लक्ष्मण काटे यांनींहि मदत केली. मी सर्वांचा आभारी आहें.

११–२–६०<br>
पुणें २.

— नरेश कवडी

ज्यांच्याकडून हें साहित्य
घेतलें त्यांनाच —

# भरली चंद्रभागा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२२६

## १ : स्थलविशेष

लोकवाणी म्हणजे लोकमनाचा जिवंत उन्मेष. स्थानिक देवदेवता, मठमंदिरें यांचें माहात्म्य आणि त्यांच्यासंबंधींच्या दंतकथा हे लोकजीवनाचे व परंपरेचे अविभाज्य घटक. लोकजीवनाशीं एकरूप झालेल्या लोकवाणीनें परोपरीनें त्यांचा उल्लेख करावा हें स्वाभाविकच आहे. या निर्देशांचा प्रकार पाहिला म्हणजे लोकजीवनाच्या साध्याभोळ्या स्वरूपाची कल्पना येते. ऐतिहासिक सत्य जिवंत ठेवण्याच्या चिकाटीचें कौतुक वाटतें. अनेकदां कल्पनेच्या खेळानें सत्य असत्याची सरमिसळ झालेली दिसते, कालक्रम चुकलेला असतो, पाठांतरांच्या चुकांनीं विनोद निर्माण झालेला असतो, तरी त्यांतूनहि जतन करून ठेवलेले अवशेष पाहिले म्हणजे मन कृतज्ञतेनें भरून येते.

महाराष्ट्रांत संतांच्या कृपेनें देव घरोघरीं झाला. संतकाव्यांतली उत्कट भक्ति लोककाव्यांत नसेल. पण बहुजनसमाजानें भोळ्या भक्तिभावानें परमेश्वराशीं केलेली सलगी संतांच्या सलगीलाहि मागें टाकील. किंबहुना, या भोळ्या भक्तिभावाला भुललेला देव मानवी रूप घेऊन भक्तांच्या कुटुंबांतला एक घटकच होऊन राहिला आहे. स्थानिक देवदेवतांच्या बाबतींत हा देव या धर्माचा किंवा तो त्या धर्माचा हा भेद मुळींच नाहीं. पंढरपूरची रुक्मिणी ज्या प्रेमानें ‘ रखमाई ’ होते त्याच प्रेमानें बेगमपूरची बेगम ‘ बेगमाई ’ होते.

पंढरपूर, बेगमपूर, माचणूर, मार्डी, बार्शी, करमाळें, मंगळवेढें, मोहोळ, माढें, अष्टे, नातेपुतें, इ० गांवें सोलापूर जिल्ह्यांतलीं ऐतिहासिक महत्त्वाचीं गांवें. हीं गांवें आणि तेथील देवदेवता यांचा उल्लेख लोकगाण्यांत वारंवार येतो.

सोलापूर, बाळें, मार्डी, नातेपुतें, सांगोलें :

सोलापूर शार दिसन्याला गुलजार ।
पान्यामंदी शिद्देशार[१] ॥
सोलापूर शार किल्ला बांदीती चिरा चिरा ।
बाळतिनीचा[२] पाया भरा ॥
वारदाच्या गिरणीमंदी[३] पानी पेत्याती गलासात ।
साचं चालती उलासात ॥
जेजुरीचा खंडोबा[४] तेला भक्तानं बलावीलं ।
तेनं बाळ्याला ठाण केलं ॥
मारडीची यमाआई तिचं रूप लई उगर[५] ।
आरदी भुईत आरदी वर ॥
विठुबाला झाली रात नात्यापुत्याच्या बाजारात ।
रुकमिनी वाट पाती कमानी दर्वाजात ॥
हे ग सांगोलं सांगोलं सोनियानं झळकलं ।
होळकरानं[६] लुटीयलं ॥

* * *

मंगळवढें, बार्शी, करमाळें :

रुसली रखमाबाई गेली मंगळवेडीईला ।
जीन घालीतो घोडीला ॥
मंगुडशारामंदी[७] पायी वाजतो खिनी खिनी ।
कळसामाघाटल्या कळवातीनी ॥
बारशीचा भगवंत[८] असा नाई पाहीयला ।
घेतो पाठकुळी बायकूला ॥
किती ग चांगला बारशीचा भगवंत ।
पाठीवर बायकू बाइलवेडा कंथ ॥

बारशीचा भगवंत अंबरीशानं धरयला ।
सोडलं सुदर्शन दुर्वासाच्या पाठीला ॥
करमाळं शअर काई वाजत जाई जाई ।
तिथं नांदती अंबाबाई ॥
करमाळं शअर रावरंबाचं[९] वतयन ।
माहादेवाचा छबीना जातो मारोतीवरयनं ।
करमाळं शअर किल्ला बांदीती बापलेक[१०] ॥
तेच्या भोतनी खंदक ॥
करमाळं शअर वळकू येतं मौलालीनं[११] ।
करतो राकण माळावरनं ॥
करमाळं शअर रावरंबाचं वतयन ।
कारंज्याच्या पान्यासाठीं करा नरूटं[१२] जतयन ॥
आदी दंडवत भवानीला मग माहादेवाला लोटांगण ।
वाऱ्यावर हालतं संगोबाचं[१३] निशाण ॥
भीमा म्हने सीता आपुन अखंड भईनी ।
पूजा बांदू संगोबाच्या चरनी ॥

* * *

बेगमपूर, माचणूर ब्रह्मपुरी :

बेगमपुराच्या पारावरी । खेळ होतूया नाटकाचा ।
बंदू कोसली पटक्याचा ॥
बेगमपुराच्या पारावरी । काल सावली सबजाची ।
बोली मंजुळ बांदवाची ॥
बेगमा आईची । तिची दरग[१४] खडकावरी ।
देउळ पाण्याच्या वाटंवरी ॥
अलिकडं बेगमाई । पलिकडं सिद्धेश्वर ।
मदी चालली भीमाबाई पवितर ॥

जाईच्या फुलाचा सुगंद सुटला । मठ पाण्याच्या वाटंला ।
स्वामी म्हाराजाचा ॥
देवामंदी देव । परशेमबुवा[१५] किती उच्च ।
म्हांगं लिंबारा म्होरं चिच ॥
नदीच्या पलीकडं । कोन निजलं इसवासी ।
तेला नागाची उसवशी ॥
सिद्देश्वर म्हाराजाचं । देऊळ रानामदे ।
जटाशंकर[१६] पाण्यामदे ॥
असं बनपुरी[१७] शअर । आंगठीवरला खडा ।
गंगेशेजारी राजवाडा ॥

माचणूरचा सिद्धेश्वर आणि बेगमपूरचे परमहंसस्वामी यांच्या कथा[१८] पुढील गाण्यांत आहेत.

सुदगौडा सुंदरीला । रेवणसिद्ध प्रसादाचा दिधला ।
उदरात गर्भ राहिला । सिद्राम अवतरला ॥
बादशासी गर्व चढला । गंगेकाठी खड्डा पाडिला ।
बुडवीन म्हणे ग लिंगाला । लश्करचा अंत झाला ॥
बादशा छळाया आले । पात्रांत मांस छाकीले ।
सिद्धाचे अगाध लिहिले । मांसाचा लेश न उरला ॥
जाईच्या कळ्या हार भरीला । सिद्धेश्वर शंकर बोला ।
काचेचा रस प्याला ॥
भीमेशी भर पूर आला । धाबळी वरी पसरीला ।
परमहंसानं घातला ॥
चार सनदा वाहून गेल्या । एक सनद दशी अडकली ।
गाव आरबुळ झागीर मिळली ॥
चार सनदा शिशाजवळी । परमहंस डळमळी ।
धिकारिले सनदाला । देहासी राम दिला ॥
परमहंस समाधी सद्‌गुरुची । गर्द छाया वर चिंचेची ।
गुरुवारी भक्त नियामाची । दर्शनी लाभ झाला ॥

* * *

## नळदुर्ग :

नळदुर्ग येथील सुप्रसिद्ध पाणीमहालाचें[१९] हें कौतुक—

भिऊऱ्या नदीचं पानी आनीले मूरी पाताळाला ।
नळदुर्गाच्या किल्ल्यामंदी पानीम्हाल केला ।
कैक जनलोक फाऊ म्हनतो कठीन रस्ता त्याला ।
म्हालावरती म्हाल बांदिले तीन खिडक्या त्याला ।
जागोजागी खेतर ठेवलं उसास जान्याला ।
फाता नेत्रा गरगर फिरती भऊत पानी त्याला ।
परळीकरानी कौतुक केलं नमस्कार वैजीनाथाला ॥

* * *

## पंढरपूर :

पंढरी ही दक्षिणेंतली काशी. तिच्या दर्शनानें महाराष्ट्राला जसा भक्तीचा उमाळा येतो तसा इतर कुठल्याहि क्षेत्राच्या दर्शनानें येत नसेल. तिच्या नुसत्या स्मरणानेंहि सोलापूरच्या लोकवाणीला विशेष भरतें यावें यांत काय नवल !

येवडी पंडरी पंडरी । हाय पंडरी पाशाणाची ।
मला आवड ग दर्शनाची ॥
येवडी पंडरी पंडरी । दुरून दिसती गुलजार ।
तिला चंद्रभागेचा चंद्रहार ॥
येवडी पंडरी पंडयेरी । वळकू येईना भिकाऱ्याला ।
सोनं देवाच्या शिकराला ॥
जलमाला येऊनी पंडयेरी पाहावी ।
पिरतीच्या पांडुरंगा लक्षे तुळस वाहावी ॥
काशी काशी म्हनूनी जन चाललं धावत ।
विठ्ठल रखमाबाई काशी माज्या गांवांत ॥

काशी काशी म्हणूनी जन चाललं कुटंवरी ।
विठ्ठल रखमाबाई काशी माजी विटंवरी ॥
पांडुरंगाच्या जवळ रखमाई बसंना[२०] ।
बुक्का आबीराची दाटी तिला सोसंना ॥
रखमाई म्हने नको विट्टलाची सोबत ।
बायकू परीस तेला भक्ताची पीरत ॥
न्हाई ऱ्हायाची जवळ म्हने रुकमीन ।
माजा डोळा लागना रातदिन जागरन ॥
रुकमीन म्हने नको पांडुरंगाचा शेजार ।
रातदिन चालतो भक्ताचा येरजार ॥

माचणूर ते पंढरपूर केवळ पंधरा सोळा मैलांचें अंतर. दिंडीबरोबर केलेल्या या लहानशा प्रवासाचें हें तपशीलवार वर्णन—

पंढरीला जाते आडवं लागतं मासरून[२१] ।
दिंडी खेळती पसरून ॥
मासरूनापासूनी आडवी लागती वजंवाडी[२२] ।
रूकमिनीला हिरवी साडी इटोबाला धोतरजोडी ॥
वजंवाडीपासूनी आडवी लागती मानगंगा[२३] ।
तिचा निरोप मला सांगा ।
मानगंगापासूनी आडवी लागती मोडवी[२४] ।
गाव दिंडीला आडवी ॥
मोडवीपासूनी आडवा लागतो इसावा[२५] ।
चित्त देऊनी बसावा । हरीच्या कीर्तनाला ॥
इसाव्यापासूनी आडवं लागतं गोपाळपूर ।
दोनी शिखरं बरोबर । इट्ठल रुकमिनीची ॥
गोपाळपुरापासूनी चंद्रभागात माजा पाय ।
असं तीर्त कुटं नाय ॥
चंद्रभागापासूनी दिसं पुंडलिकाची माडी ।
हाती सवळ्याची[२६] घडी ॥

पुंडलिकापासूनी दिसती ऐरावती ।
मोती चौकांत मारूती ॥
मारूतीपासूनी दिसतो चोकामेळा ।
सर्व सादू झालं गोळा । हरीच्या कीर्तनाला ॥
चोकामेळापासूनी नामदेवाची पायरी ।
हरी गर्जतो राऊळी । येतो आवाज बाहेरी ॥
नामदेवापासूनी पायरी लागली चडाची ।
गार सावली वडाची । तेतीस कोटी देवावरी ॥
वढायापासूनी आडवी लागती चवकट ।
धरी चरन बळकट । हरीचे ॥
चवकटीपासूनी आडवं लागतं कवाडा ।
ऐका सादूचा पवाडा ॥
कवाढापासूनी आडू येतो दाटनीला ।
चरन येईना वाटनीला । इट्टलाचा ॥

दिंडीच्या प्रवासाप्रमाणेंच, देवळांत प्रवेश केल्यानंतर भक्ताच्या भुकेल्या नेत्रांनीं देवाचें ध्यान कसें पाहून घेतलें याचा हा तपशील—

सिंवासनापासुनी देवा देखीले तुमचे पाई[२७] ॥
असं तीर्थ कुठं नाई ॥
पायापासूनी देवा देखीले तुमचे डोळे ।
असं तीर्थ झाले भोळे ॥
डोळ्यापासूनी देवा देखीलं तुमचं मूख ।
माझी हरली तानभूक ॥
मुखापासूनी देवा देखीली तुमची पाठ ।
तीर्थ घडलीं तीनशे साठ ॥
पाठीपासूनी देवा देखीली तुमची न्हाणी ।
झाली पातकाची धुणी ॥
दर्शन घेऊनी आले मी मंडपांत ।
गरुडखांबाला दिली भेट ।

मंडपात येऊनी डाव्या हातात माझ्या निऱ्या ।
गरुडखांबाला घाली फेऱ्या ॥
देवाच्या देवळात उभी होती मी बारीला ।
पडलं संकट हारीला ।
देवाच्या देवळात उभी होती मी एक्या कोनी ।
नेत्र उघड देवा दोनी ॥

हा झाला दर्शनाचा सोहळा. पण आपल्या देवांच्या मूर्तींना कलाकुसरीनें सजविणाऱ्या बडवे–उत्पातांचें कौशल्य पाहिल्यावर त्यांचेंहि कौतुक केल्याशिवाय राहवत नाहीं—

उत्पातपरीस बडवे चतूर ।
केलं गंधाचं धोतर ॥
बडव्यापरीस उत्पाताची कारागीरी ।
केली गंधाची शेलारी[२८] ॥

* * *

पंढरीला जाते—

पंढरीला जाते ओटीला काय घेऊं ।
देवा विठ्ठलाला तुळशी बुक्याची प्रीत बहू ॥
पंढरीला जाते ओटीला माझ्या केळ ।
देवा विठ्ठलाच्या झाली शेजारतीची वेळ ॥
पंढरीला जाते एकादशीच्या ओढ्यानं[२९] ।
विठ्ठल रखमाबाई भेटली जोड्यानं[३०] ॥
पंढरीला जाते एकादशीच्या दिवशी ।
देवा विठ्ठलाला वाहू हिरवीगार तुळशी ॥
दुरून दिसती पंढरी पिवळी ।
मूर्त स्वयंभू सावळी ॥

हातांत टाळवीणा पायी रत्नाच्या खडवा[३१] ।
पंढरीराया माझा जातो संताला आडवा ॥
चंद्रभागे तुझं पाणी सोन्याच्या गुंडीमधे[३२] ।
ज्ञानोबा तुकाराम संत तान्हेले दिंडीमधे ॥
पंढरपुरामधे कशाचा गलबला ।
चाल्या आळीला रथ आला । पांडुरंगाचा ॥
पंढरपुरामधे कशाची ठोकाठोकी ।
चंद्रहारासाठीं पांडुरंग सोनं जोखी ॥
पंढरपुरामधे नाही कुणाचं देणं घेणं ।
तुझ्यासाठी केलं येणं । पांडुरंगा ॥

* * *

भरली चंद्रभागा :

पंढरपुराच्या माहात्म्यामुळें चंद्रभागेलाहि पावित्र्य आणि माहात्म्य प्राप्त झालें आहे. चंद्रभागेचें पाणी म्हणजे चौऱ्यांशीचा फेरा चुकविणारें पापनाशक तीर्थच. मग चंद्रभागेला पूर येऊन जिकडे तिकडे हें तीर्थच तीर्थ दिसूं लागल्यावर भाविक मनाच्या भक्तीलाहि उधाण आल्याशिवाय कसें राहील ?

भरली चंद्रभागा पाणी चाललं दोही थड्या ।
पंढरीराया माझा पोहणार टाकी उड्या ॥
भरली चंद्रभागा पाणी चाललं आनंदानं ।
लोटिल्या नावा देवा गोविंदानं ।
भरली चंद्रभागा नावेचा घोडा बुडे ।
कानडी रखमाबाई पतिव्रता होय पुढे ॥
भरली चंद्रभागा सोळखांब्याचा चिरा हाले ।
कड्याखालून नीरा[३३] चाले

भरली चंद्रभागा पाणी लागलं खोडाला[३४]
देव कुंडलीक बुडाला ।
भरली चंद्रभागा पाणी लागलं सोप्याळा[३५]
विठ्ठल विठ्ठल हाका मारिती सख्याला ॥

पुढील ओव्या बेगमपुराजवळील चंद्रभागेच्या पुराला उद्देशून आहेत—

भरली चंद्रभागा पाणी लागलं तटाला ।
उभा हरदास घाटाला ॥
भरली चंद्रभागा पाणी दिसतं लाल लाल ।
जटा धुवूनी गेले काल[३६] ॥
भरली चंद्रभागा दह्या दुधाच्या उकळ्या ।
सिद्धेश्वर[३७] महाराजानी जटा सोडिल्या मोकळ्या ॥
भरली चंद्रभागा उतार दे ग माय ।
पलिकडं जाणं हाय ॥
भरली चंद्रभागा बेगमाईला नारळ फोडा ।
मग नावीचा दोर सोडा ॥
बेगमाआईची चोळी कशानं भिजयेली ।
हिनं नावेला भुज दिली ॥

* * *

## २ : कथा-काव्य

ऐतिहासिक, पौराणिक कथा, आख्यायिका यांना लोकसंस्कृतींत महत्त्वाचें स्थान आहे. बहुजनसमाजाच्या आचार विचारांना यांतूनच सामाजिक पाठिंबा ( Social sanction ) मिळतो. या कथांनीं लोककाव्यांत घेतलेलें रूप पाहिले म्हणजे बहुजनसमाजाची बौद्धिक पातळी, विचारसरणी, तर्क-प्रणाली यांची चांगली कल्पना येते. त्याच्या आवडीनिवडी कळतात.

दामाजीची कथा :

या गाण्यावर गुरुनाथ निरंजनच्या दामाजीविषयक प्रसिद्ध स्त्रीगीताची छाया दिसते. परंतु कथेंत निराळेपणा आहे.

गादीचा धनी हो म्हाराज । येउन[1] करी राज । सम्रत बादशा बेदरचा । दामाजी दिवान त्याचा । मामलेदार मंगळवेढ्याचा । वसूल सरकाऱ्याचा । साऱ्याच्या बदली माल भरिला । तीन वर्सं गेला पाउस । उडाला ऊस[2] । एकाएकी कठीण समय घडला । दुर्गा-देवीचा[3] काळ पडला । पाचुंदे चार कडब्याचे झाले रुपयेला । गाई-म्हशी वारल्या दावनीला । कैकानी सोडिले सेत । गेले बाजारात । गुरेढोरे इकले येपाराला[4] । चार चार बैल रुपयेला । हातामंदी कडी-तोडी मोत्याची जाळी कानामंदी । बाळी मोडुनी । द्यावी सरापाला । दागिने घेउनी गेले दुकानाला । अशी कैक हिंडती पेटंनी । कर्ज लावुनी । वजन हातनी[5] कुनी लाविना तागडीला । धान्यासाटी इकले दुकानाला । संत धावुन पंढरपुरी आले मुक्कामाला । बर्तना[6] करिती इटोबाला । असा भडजी बोलतो त्येला । अशा समयाला धस्टपुस्ट कसा तुमी बनला । काइतरी दिसती खायाला । रघुपती बोलं धान्य समरुद[7] । चला आमी दाकवित तितं । आमच्या घरी धान्य काय होतं[8] । एकवचनी दामाजी असे इथुनी सा कोस । मुक्कामासी जाउ वाड्यांत । त्येज्यापशी पोटाड्या भरल्यांत । मग पंढरपूरचा ठाट

लोक आटूकाट । मिळुनि गेले मंगळवेढ्यात । तथं दामाजीपंत । हाय तुमच्या पदरीं आंबारी[९] । दोन मापारी[१०] । गंगा जमना[११] दोन पेव वाड्यात । त्यावर आमचं हीत । आमासी तुमी दयावंत । न्हाई म्हागारी जात । उपजली दया दामाजीच्या मना । नउशे खंड्या धान लुटलं लोकांना । लक्ष मनुश वाचला । समादान झालं इटूबाला । बादशा बेदरचा खवळला । पाटविले शिपै लोकाला । आनलं धरून दामाजीला । म्हने असा कसा तूं झाला । आमचा पैका बुडविला । देतो सुळावर तुला । इटूबाला पडलं संकट । म्हने रुकमिनीला उट उट । माज्यापाई दामाजी सुळावर जातो । माज्या नावाला बट्टा लागतो । रुकमीन म्हने नका हू चिंतागंती । माजं अळंकार घेउन जावा दरबारामंदी । पैका भरून रसीद घ्यावी हाती । नका इलंब लाउ करा जलदी । म्हाराचं सोंग घेतलं देवानं । लंगुटी लाऊन । थडकलं बेदरला जाउन । दरबारामंदी पैका ओतला । सोडा सोडा व माज्या दामाजीला । दामाजीपंतानं चरन धरलं । माज्यापाई का व कस्ट घेतलं । बादशा म्हने दामाजीला । खुशी तुज्यावर अल्ला ।

* * *

कृष्ण-कंस युद्ध :

गोकुळामदे क्रिश्ण काना नांदीतो भउ अनंदानं ।
मातेच्या रुसन्यासाटी ल्हानपण घेतलं देवानं ।

वैराळाचं रूप धरूनी निगाला भगवान ।
घ्या घ्या ग बायांनो रत्नझडीताचं लेनं ।

एका एका चुड्याचं मोल सांगा खरोखरी ।
सवा लाक सोनटका[१२] ऐक सुंदरी ।

झापा झापा पेटाडी चुडा तुमचा मोलाइचा भारी ।
दुबळा आमचा पती हय ना घरी सेजारी ।

उडत उडत खबर गेली कमळजाच्या वाड्यासी
कुन्या देशीचा वैराळ आला आपल्या गावासी ।
जावा जावा सैल्यानो[13] वैराळ आणा वाड्यासी ।
पुडे सैली माघं वैराळ आला वाड्यासी ।

उटकर बसकर चंदनपाट टाकिती बसन्यासी ।
उगडा उगडा पेटाडी काडा चुडा सोनेरी ।

कोट सुर्व्यांचं त्याज झळकीते एका चुड्यावरी ।
तवा कमळजाणी बाई हातात हात दिला ।

चुडा भरला हातायला ।
अरे अरे वैराळा कळ माज्या लागली मनगाटी

अरे अरे वैराळा चुडा माजा सैल करवा[14] ।
आणा आणा इळा खिळा अणकी सुरी ।

चुडं कापायचं खरग इसरला घरी ।
कमळजा गेली पतीच्या मंदिरी ।

उशाखालचा खरग दिला कासाराच्या हाती ।
जावा जावा मामी यवडा निरोप द्यावा मामाशी ।

गोकुळचा भाचा देव आला इवदाशी[15] ।
कमळजा गेली पतीच्या मंदिरी ।

उठा उठा स्वामी तुमा काळझोप लागली ।
उशाखालची चोरी खरग भाच्यायानं केली ।

दचकुन जागा झाला चटकन उटला ।
दोगाचं यवद लागलं त्या एका मैदानाला ।

मारीला कौंस मामा गाईच्या गोठ्यामंदी ।
त्याच्या असुदाचं[16] लोट गेलं मथुर पेटमंदी ।

* * *

नामदेवाचें लग्न :

नामदेवाच्या लगनाची वर्दी पंडरीत गेली ।
इट्टल देव बोले नवरी बेदरीची केली ।
नामदेवाच्या लगनाला नवता हळदकोम[१७] ।
सावळा पांडुरंग आला साय्या[१८] भगवान ।
नामदेवाच्या लगनाची पाल पडली बेदरात ।
वारू सजवला पंडरीत ।
नामदेवाच्या लगनाला व्हातोया हमरस्ता ।
सावळा इट्टयेल म्होरं गेलं गुमास्ता ।
नामदेवाच्या लगनाला द्याव[१९] निगाले आटीकोट ।
बेदर नगरीचा झाला घाबरा बाबूशेट ।
नामदेवाच्या लगनाला मूळ व्हराड कोन कोन ।
माज्या मारुतीला तोप वा त्याला लिंब दोन[२०] ।
नामदेवाच्या लगनाला नाई व्हराड दिसयेत ।
सारदा खांद्यावरी आला गणपती नाचत ।
नामदेवाच्या लगनाला सर्व्या देवाची तयारी ।
गणपती म्हाराजाची आली उंदरावर स्वारी ।
नामदेव नवरा झाला हळद लाउनी पिवळा केला ।
नवरा बेदरला न्हेला ।
नामदेव नवरा झाला बशी[२१] पंडरीच्या पारावरी ।
सोन्याची मंडवळी[२२] हेच्या सावळ्या तोंडावरी ।
आगास मंडयप चंद्रसूर्या भिवलं अक्षता टाकाया ।
इंद्रसभा चालं देव राही रुखमिनी धरती पदरला ।
इट्टल देव पुरवा अक्षता व्हराडाला ।
नामदेवाचं लगीन इट्टलानं केलं ।
गरुडाच्या पंकावरी द्याव बेदराला गेलं ।
रुखमिनीला साडीचोळी इट्टलाला लाल शेला ।
धामनगावचा आयेर बोदल्यानं[२३] केला ।

* * *

तुकोबाचें प्रयाण :

तुकारामाच्या वैकुंठगमनाचें ऐतिहासिक सत्य कांहींहि असो. लोकवाणीनें रंगविलेलें चित्र असें आहे—

तुका निगाला हाती घेऊनी टाळईना ।
असा हिंडतो घरुघरी । कोन निगीना बरुबरी ॥

तुका म्हने आईला चला जाऊ वैकुंटी ।
आई म्हने तुक्या तुजी लई झाली चावटी ॥

तुका म्हने भाबाला आमच्या बरुबर यावा ।
भाव म्हने आमाला तुमचा कावा ठावा ॥

वैकुंटाला चल तुका म्हने भईनीला ।
इंदरसभेऊन चोळी धाडा बीजईला[२४] ।

तुका म्हणे बायकूला वैकुंटी येती काय ।
बायकू म्हने हितं सौंसार मस[२५] हाय ॥

परंतु तुकोबा खरोखरच वैकुंठाला गेले तेव्हां—

तुका बी म्हनू तुका । हाक्या मारिती त्याची आई ।
तुका वैकुंटी गरगाई[२६] ॥

तुका बी म्हनू तुका । हाक्या मारिती त्याची भैन ।
तुका वैकुंटी झाला गैन[२७] ।

तुका बी म्हनू तुका । हाक्या मारितो त्याचा बाप ।
तुका वैकुंटी झाला गप ।

तुका बी म्हनू तुका । हाक्या मारितो त्याचा भाऊ ।
तुका वैकुंटी झाला देऊ[२८] ॥

* * *

## ३ : कुटुंब-समाज

मराठी कुटुंबपद्धति म्हणजे पितृप्रधान व मातृप्रधान कुटुंबपद्धतींचा वैशिष्ट्यपूर्ण संकर. इतकीं विविध आणि वैशिष्ट्यसंपन्न नातीं जगांत इतरत्र कुठल्याहि कुटुंबांत सापडणार नाहींत. तीच गोष्ट समाजरचनेची! या समाजाचे विविध घटक आपापलें स्वतंत्र अस्तित्व मोठ्या दक्षतेनें जतन करतांना दिसतात आणि त्याचबरोबर आर्थिक, वैचारिक व तात्त्विक दृष्टींनीं परस्परांशीं निगडित असल्याची जाणीवहि दर्शवितात. या कौटुंबिक व सामाजिक जीवनाचें प्रामाणिक चित्रण लोककाव्यांत पाहायला मिळतें

साळू जातीया सासऱ्याला :

साळू जातीया सासऱ्याला । त्येला कशाला गाडीघोडं ।
चंद्रभागंला पानी थोडं ॥
साळू जातीया सासऱ्याला । तिच्या वटीला कवळी पानं ।
तिच्यासंग मुराळी पैलबान ॥
साळू जातीया सासऱ्याला । तिच्या वटीला गूळशेंगा ।
एकादशीचा नेम सांगा ॥
साळू जातीया सासऱ्याला । येशीपतूर आयाबाया ।
कडंपतूर बंदूराया ॥
साळू जातीया सासऱ्याला । काय रडती धाईधाई ।
गेल्याबगर भाग नाई ॥
साळू जातीया सासऱ्याला । आयाबाया भेटूईना ।
मिटी गळ्याची सुटंयना ॥

पण एकादी साळू हासत खेळत सासरी चालली तर—

साळू जातीया सासऱ्याला । जाती हासत खेळयत ।
नाई अजूनी कळयत ॥

* * *

अशी बायको :

अशी बायको तोंडाळ नाव जगवाडी ।
नवरा धाडी शेती मागं धैभात झोडी ।
आल्या नवऱ्याच्या भैणी । चुली फुका वैनी ।
लाइन[१] बुक्क्या दोनी डोळ्या येतं पाणी ।
आल्या बायकूच्या भैणी । शेर शेर लोणी ।
आन् डेरा हंडा पाणी ।
न्हाउन तरी जाय बाय जेउन तरी जाय ।
आलं नवऱ्याचं भाउ । सरलं हंडीतलं घऊ ।
रस्त्यानं जाऊ मागं फिर फिर पाऊ ।
आलं बायकूचं भाउ । त्याला सोनसळे घऊ ।
पोळ्या केल्या ल्हऊ[२] बाबा निचितीनं जेऊ ।
आली नौरीची माय । धैभात खाय ।
मोटथा मजंमंदी ऱ्हाय ।
पाइ पाइ जाउ नको गाडीमंदी जाय ।
आली नौऱ्याची माय । बासा[३] तुकडा खाय ।
खाशीन तर खाय नायतर वाटनं जाय ।
आलं नौऱ्याचं बाप । राती होतं बासं ताक ।
फुरक्या मारा मामाजी ढोंगी[४] लावा सासराजी ।

* * *

भावाच्या घरीं :

भावाच्या घरीं भैन लोभली । वैनी भाकरी का देइना ।
हाय तितं शिळा टुकडा घेऊन का खाइना ॥
भावाच्या घरी भैन लोभली । वैनी पाणी का देइना ।
हाय तितं फुटका गलास घेऊन का पीना ॥

भावाच्या घरी भैन लोभली । वैनी तेल का लावीना ।
आमच्या गावी तेलीण नाइ तशीच का जाइना ॥
भावाच्या घरी भैन लोभली । वैनी बांगडी का भरीना ।
आमच्या गावी कासार नाइ तशीच का जाइना ॥
भावाच्या घरी भैन लोभली । वैनी जोडवे का करीना ।
आमच्या गावी सोनार नाइ तशीच का जाइना ॥
भावाच्या घरी भैन लोभली । वैनी गाडी का देइना ।
आमच्या गावी सुतार नाइ पाइच का जाइना ॥

* * *

भाऊ—बहीण :

बहीणीवाचूनी भाऊ दिसतो सुना ।
आता आउक्षाची ओवी गाते मी अर्जुना ॥
दुबळा पांगळा भाऊ बहिणीला असावा ।
तांब्याभर पाणी एका रात्रीचा विसावा ॥
धनसंपत्तीची नाही मजला आसोशी ।
भाईराया तुम्ही सुखी मी संतोशी ॥
तोंडी मानिला भाऊ सक्खा काय देतो ।
द्वारकेचा कृश्ण वेळेला कामा येतो ॥
तोंडी मानिला भाऊ सक्ख्यापरीस आगळा ।
द्रौपदीला छंद घननीळाचा लागला ॥

* * *

कृतज्ञता :

बापाजीचे उपकार मी ग फेडीन काडी काडी ।
तुझे भिनले माझ्या हाडी । मायबाई ॥
बापाजीचे उपकार फिटती काशी गेल्या ।
तुझे फिटेना काही केल्या । मायबाई ॥

नऊ महिने आहे वागविलं डाव्या कुशी ।
तिला फिरूनी बोलू कशी । मायबाईला ॥
कामकाजाला नाही मी भ्याले ।
दूध वाघीणीचं प्याले । मायबाईचं ॥
बापाजी ईश्वर मायबाई पार्वती ।
माझ्या नंदीला शोभा किती । भाऊरायाला ॥

* * *

दळण दळितांना :

दळण दळीताना मनगटाचा देते झोला ।
निरशा दुधाचा कैफ आला ॥
दळण दळीताना करीते भिंगरटी ।
दूध खेळतं मनगटी ॥
दळण मी दळी पीठ काढीन रवा रवा ।
कटकी[५] धाडी मेवा । सावळ्या भाईयाला ॥
दळणाची पाटी अखंड जात्यावरी ।
अन्नछत्र सदा घरी । सावळ्या भाईयाच्या ॥
दळण मी दळी पीठ काढीन मोदकाचे ।
जेवण राजसाचें । सावळ्या भाईयाचे ॥
दळण मी दळी उरलं एक पायली ।
शत ओवी मी गायीली । पांडुरंगा ॥
दळण मी दळी उरलं सोपाकोनीं[६] ॥
गायीली रत्नं दोनी । विठोबा रखुमाई ॥
दळण मी दळी उरला एक दाणा ।
गोकुळी क्रिशण तान्हा । यशोदाबाईचा ॥
सरलं माझं दळण सरल्या पुरत्या गंगा[७] ।
काशीच्या ज्योतीलिंगा । नमस्कार ॥

* * *

हळवें मन :

जळो पापिणीची द्रिश्ट । मिठाच्या झाल्या लाह्या ।
त्याच्या वाटोळ्या दंडबाह्या । तान्ह्या बाळाच्या ॥
जळो पापिणीची द्रिश्ट । गेली पाळण्यावरूनी ।
उभा कळस धरूनी । तान्हा बाळ ॥
जळो पापिणीची द्रिश्ट । मिठाचं झालं पाणी ।
माझा कोमेला फुलावाणी । तान्हा बाळ ॥
माळ्याच्या मळ्यामधे । इसबंद कुठे नाही ।
द्रिश्ट झाली करू काई । तान्ह्या बाळाला ॥
माळ्याच्या मळ्यामधे । ऊस आला कोवळा ।
द्रिश्ट लागली जावळा । तान्ह्या बाळाच्या ॥
माळ्याच्या मळ्यामधे । इसबंदाचा एक वाफा ।
द्रिश्ट लागली लेकबापा ॥
मोठे मोठे डोळे जसे लिंबवाच्या फोडी ।
सई बापाची द्रिश्ट काढी ॥
मोठ मोठे डोळे जसे आंबीयाच्या फोडी ।
तुझी मावशी द्रिश्ट काढी ॥
मोठे मोठे डोळे भुवया नामी नामी ।
द्रिश्ट काढी तुझी मामी ॥

* * *

सहानुभूति :

रुखमिणीला साडीचोळी । सत्यभामेला लुगडी ।
थंडी गारव्याची दारी तुळस उघडी ॥
रुखमिणीला साडीचोळी । सत्यभामेला पातळ ।
तुळशीबाईची दारी सावली शीतळ ॥
रुखमिणीला साडीचोळी । सत्यभामेला दोरवा ।
तुळशीबाईला थंड पाण्याचा गारवा ॥

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 99228

तुळशीबाई नको हिंडू तू जंगलात ।
पईस[10] वाडा माझा जागा देते अंगणात ॥
सकाळी उठूनी उघडीते मी परसदार ।
तुळस पतिव्रता द्रिश्टी देखिली हिरवीगार ॥
सकाळी उठुनी काम मी काय केलं ।
तुळशीमातेचं व्रिंदावन सारवीलं ॥
माझ्या अंगणात आहे तुळशीचा वाफा ।
रात्रंदिवस गोविंद घाली खेपा
रुखमिणी पुसते देवा आवड कोणाची ।
काय सांगू ग रुखमिणी माझी तुळस गुणाची ॥
माळ्याच्या मळ्यामधे तुळशी वाळुनी झाल्या कोळ ।
प्रीतीचा पांडुरंग कंठी शेजारी घाल माळ ॥
तुळशीच्या माळा एका बइलाचं ओझं ।
प्रीतीच्या पांडुरंगा श्रीमंती लेणं तुझं ।
पहिली माझी ओवी तुळशीच्या झाडा ।
दामाजीपंताचा गावाबाहेर राजवाडा ॥

* * *

मेतीच्या भाजीला शेपूची मीळवण ।
सीता न्हेलीया चाळवून ॥
सीताबाईचा वनवास घ्या ग बायानो वाटुनी ।
बटा लावीला दाटूनी[11] ॥

* * *

जनी बसली न्हाण्याला पाणी कढत कढत ।
जनीला नाही कोणी विठ्ठलाला माहीत ॥
जनी बसली न्हाण्याला पाणी नाही विसणाला ।
पंढरीच्या विठ्ठलाची लगड गेली नदीला ॥
जनी बसली न्हाण्याला देव उकलीतो वेणी ।
देवा विठ्ठलावाचूनी जनीला नाही कोणी ॥

* * *

इटलदेव बोलं जनी माजी वनवासी ।
चंद्रभामाच्या काटी धुनं धुवती उपवासी ।।
इटलदेव बोलं जनी चल तुळशीच्या बनी ।
सोड बुचडा घालतो येनी ॥
दळणाची पाटी ठेवीली दारावरी ।
इटलदेव बोलं जना उजाडलं दारी ॥

* * *

दुर्पती गांजीली चावडीच्या कोना ।
खाली घातलीत्या माना । पाची पांडवानी ॥
दुर्पतीची लज्जा घेतेती दुर्योदन ।
तिच्या जीवासाठी चाटी झालेली नारायन ॥
दुर्पतीची लुगडी फेडिता भागिली ।
दिंड कैलासा लागली ॥

* * *

समरसता :

बारा बलुत्यानी येडीला[१२] तुजा पाय ।
आदी सुतार वाटं लाव ॥
माज्या दारावरनं कोन गेला बामयन ।
हाती फुलाचं तामयन ॥
सकाळी उटूनी सडा शिंपीती शेनाचा ।
मला शेजार बामनाचा ॥
घडीचं धोतार वाळतं जोमानं ।
मला शेजारी बामन
जातीचा मुसलमान माज्या रांजनी पानी पेला ।
दीन[13] गाजवीत गेला ॥

* * *

## ४ : इच्छा-आकांक्षा

भारतीय संस्कृति अध्यात्मप्रवण असून आधिभौतिक उन्नतीकडे तिनें दुर्लक्ष केलें आहे अशीं विधानें नेहमीं केलीं जातात. परंतु लोककाव्यांतली 'लक्ष्मी'ची स्तुति ऐकली कीं, भारतीय समाजाला लौकिक अभ्युदयाची किती आवड आहे हें दिसून येते. समृद्धि, वैभव, धनदौलत यांचें लोकवाणीनें प्रांजळपणें गुणगान केलें आहे. महाराष्ट्रांतल्या असंख्य स्त्रिया म्हणत आल्या आहेत—

लक्षुमी आली घरा आता आलेली जाऊ नको ।
माझिया कंथाचा धरला पालव सोडू नको ॥

सर्वसामान्य जनतेची आकांक्षा याहून अधिक चांगली कुठें व्यक्त झाली असेल ? आध्यात्मिक बैठक आणि लौकिक आकांक्षा यांचें परिणामकारी चित्रण लोकगाण्यांत झालेलें आहे.

लक्ष्मी :

लक्षीमीबाई आली । बैस माझ्या ओसरीला ।
भाईराजसानं लोडगाद्या पसरील्या ॥
लक्षीमीबाई आली । आली पांगुळ पायाची ।
सख्याला भाक दिली आता नाही मी जायाची ॥
तिनी ग संध्याकाळी । दिवयाची जल्दी करा ।
मोत्या पोवळ्यानं लक्षीमीची ओटी भरा ॥
लक्षीमीआई आली । दर्वाजाला का ग उभी ।
बाळराजाच्या ग माझ्या वाड्यात जाऊ दोघी ॥
लक्ष्मीआई आली । आली तशी जाऊ नको ।
भाईराजाला ग माझ्या अंतर देऊ नको ॥
लक्षीमीआई आली । आली शेता शिवारात ।
मामंजी सासऱ्याच्या थंड पाणी घागरीत ॥

*　　*　　*

लक्षीमीबाई आली जोत्याचा काठ चढे ।
हाती शाल पाया पडे । भाईराज ॥
लक्षीमीबाई आली तांब्यानं ताक प्याली ।
गवळ्याला भाक दिली । भाईराजाला ॥
लक्षीमीआई आली पांगळ्या पायायाची ।
तुझ्या जलमा जायायाची । बाळराजा ।
लक्षीमीआई आली तिनी सांजाच्या सुमारानं ।
गादी झाडीतो रूमालानं । भाईराज ॥
लक्षीमीआई आली, आली उठत बसत ।
वाडा सख्याचा पुसत । बापाजीचा ॥
तिनी ग संध्याकाळी लक्षीमीची येरझार ।
सख्या उघड देवघर । भाईराजा ॥

*   *   *

लक्षुमीआई आली । आली सोन्याच्या पावलांनीं ।
जोतं चढती डवलानी ॥
लक्षुमीआई आली । आली घराच्या म्हागूयेनी ।
कनगी पेवाला लागूयेनी ॥
लक्षुमीआई आली । आली तांबडं फुटताना ।
नंदी दावनी सुटताना ।

आणि मग ही लक्ष्मी जेव्हां भक्तावर प्रसन्न होतें—

लक्षुमीनं दिला हात । पिकलं पिकलं बोलत ।
नंदी बुडाले राशीत ॥
लक्षुमीनं दिला हात । पिकलं पिकलं [१]मालदांडी ।
एका [२]हेलाला सव्वा खंडी ॥
लक्षुमीनं दिला हात । जन बोलत चावडीला ।
रास लागली [३]वावडीला ॥
लक्षुमीनं दिला हात । जन बोलली जागोजाग ।
पेवं भरली शिगोशीग ॥

लक्षुमीनं दिला हात । जन बोलती वावराला ।
कणगी भरल्या ओसरीला ॥

पुढील गाणें विविध आकारांत व स्वरूपांत सर्वत्र ऐकायला मिळतें.

समुद्र केलासे मंथन । लक्षुमबाई निघाली रतन ।
लक्षुमबाई तू सारजा । लक्षुमबाई तू गिरजा ।
लक्षुमबाई तू चंडिका । लक्षुमबाई तू अंबिका ।
लक्षुमबाई तू कोकिळा । तुझा वर्ण सावळा ।
तुझा सुंदर असे गळा । कंठी नवरत्नांच्या माळा ।
तुझा भाव ग निराळा । तुझा सल्ला ग वेगळा ।
चाफेल, मोगरेल तेल आणा । लक्षुमबाईला न्हाणे घाला ॥
लक्षुमबाई चंचल मोठी । तिच्या पदरी सव्वा लक्ष मोती ।
लक्षुमबाईची वेळ आली । धरात बाहेर दिवे लावा ।
तिची ताटवाटी करा । तिचा नैवेद्य विस्तरा ।
लक्षुमबाई जेविते कुसरी । भाजी वाढावी दुसरी ।
भात वाढा जिरेसाळी । पवित्र मुगाची डाळी ।
साजुक तूप अनशूद घाली । दारचा गलबला राहू द्या ।
घरातला गलबला राहू द्या । तिचा डोळा लागू द्या ।
लक्षुमबाई जागी होते । निजभक्ता बोलाविते ।
लक्षुमबाई झालीसे प्रसन्न । भक्ताला दिले सिंव्हासन ।
तिळा तांदुळाच्या राशी । [४]चौकोनी वावरशी ।
ये लक्षुमी बैस बाजे । माझे घर घरतुला साजे ।
तुझी स्तुति जे गाती । तुझी स्तुति जे ऐकिती ।
त्याचे दुःख दाळिद्र जाती । त्याचे मनोरथ पूर्ण होती ।

वैभव–कौतुक :

थोरलं माझं घर हंड्या झुंबराचं ।
वडिल देसायाचं बापाजीचं ॥
थोरलं माझं घर वाटसरा पाणी प्यावं घरी ।
नाव जातं दूरवरी ॥

बापाजीचा वाडा चिरबंदी पाया खोल ।
मधी द्राक्षाचा वेल ।
बापाजीचा वाडा कोण येऊनी पुसतो ।
खांब रत्नाचा दिसतो ।
भुकेल्या ब्राह्मणा घ्यावं जेवण पक्वान्नाचं ।
माझ्या बापाजीचं घर पुण्यवानाचं ।
उंचच्या ओसरीला हिरवा कंदील झुलतो ।
राघू थोराचा खेळतो ॥
उंचच्या ओसरीला उभे चंदनाचे पाट ।
आहे वकीली तुझा थाट ॥
उंचच्या ओसरीला समई ठेविली मोराची ।
कन्या खेळती थोराची ॥
उंचच्या ओसरीला साठला ग दाळदाणा ।
भाईराजाचा माझ्या जमेदारी कारखाना ॥
उंचच्या ओसरीला हे लोडाचं टेकण ।
भाईराजाचं माझ्या सोन्यामोत्याचं दुकान ॥
सोनसळी गहू माझ्या ग साठप्याला ।
इथं येणं भादव्याला । लक्ष्मीआईचं ॥
सोनसळी गहू रवा पडतो दाणेदार ॥
आहे पुण्याचा जेवणार । भाईराज ॥
आंबेमोर तांदूळ अधणी खुलतात ।
वाट सरदार चालतात ॥
वाढील्या चारी शाखा पंचामृत लवंगाचं ।
आहे जेवण तेलंगाचं ॥
वाढील्या चारी शाखा पापड नाही झाला ।
यांचा नैवेद्य खोळंबला ॥

* * *

ये ग घरला पावणा । घरची जिलबी न्हारीला ।
लाडू दुसऱ्या बारीला ॥

शिवंच्या शेतामंदी । तिथं हाटोळा[८] चिरबंदी ।
एका शीणंचं चार नंदी ।
माज्या हवसनं मळा केला । बारा बैलाच्या जीवावरी ।
अंबा जांबळी धावंवरी[९] ।।
माज्या हवसनं मळा केला । बारा बैलाच्या जीवावरी ।
तेचा कुणबाव[१०] कुटंवरी ।।
यवढी हवस मला मोटी । यवढ्या तांबड्या लुगड्याची ।
पेट धुंडली मंगुड्याची ।।
हवस मला मोटी । पायी भरून जोडव्याची ।
चांदी आनावी बड्ड्याची ।।
शिंदेशाई तोडे नवे केले दसऱ्याला ।
हवस माज्या भरताराला ।।
काळी चंद्रकळा पाच उणं पन्नासाची ।
वर चोळी जिन्नसाची[११] ।।
वाटंवरचा मळा कुन्या हवशाचा ।
बैल मोटंला सवाशाचा ।।
वाटंवरला मळा कुन्या येल्हाळाचा ।
चरखा[१२] चालतो गुराळाचा ।।
ये ग गाडीच्या मागं गाडी । मदली गाडी खजिन्याची ।
मैना झुलती दागिन्याची ।।

* * *

अभिमान :

घराची घररीत काय पहातोस पारख्या ।
लेकी सुना त्या सारख्या ।।
घराची घररीत आल्यागेल्याला दिसती ।
भावा भावाची प्रीत मोठी ।।
घराची घररीत नांव गेलं लांबवरी ।
जावा नांदती एका घरी ।।

घराची घररीत जशी रानची कस्तूर ।
जनलोका जाहीर ॥
बंधूजी घेतो चोळी । भावजय म्हणे उणाक[१३] घेऊ नका ।
नंदा दिल्यात थोर लोका ॥

* * *

मागणें :

माझ्या ग दारावनं । रुशि गेले ग देवाला ।
आउक्ष चिंतीती बापाला ॥
माझ्या ग दारावरनं । रुशि गेले ग नदीला ।
आउक्ष चिंतीती भावाला ॥
माझं ग आउक्ष संदकीं साठवीते ।
तुझ्या कंथाला पाठवीते । लेकीबाई ॥
सर्वांआधी आउक्ष चिंतीती कोणाला ।
सासूबाईच्या लेकाला ॥

* * *

पड पड रे पाऊसा । पिकू देरे मूगराळा ।
भाई माझा लेकुरवाळा ॥
पड पड रे पाऊसा । होऊ दे ओली माती ।
गाईच्या चाऱ्यासाठी कुणबी काकुळती ॥
काळ्या सावळ्या मेघानी आभाळ दाटलं ।
पेरणी करायाला । बाळ कुणब्याचं नटलं ॥

पसायदान :

काळी ग चंद्रकळा । तिला जरीची सोनसळ ।
देवा विठ्ठला सांभाळ । सर्वत्राना ॥
अरे नारायणा विठ्ठला । सर्वत्राचं भलं कर ।
शेवटी हाती धर । बाळराजाला ॥

* * *

## ५ : संकीर्ण

लोकसाहित्यांत ओव्या, गाणीं, म्हणीं, उखाणें या सर्वांचाच समावेश होतो. मराठी लोककाव्यांत भावमाधुर्याच्या दृष्टीनें ओव्या सर्वश्रेष्ठ असल्यानें आजवर ओव्यांचें संकलन व प्रकाशन विशेष झालें आहे. कथात्मक गाणीं सोडलीं तर इतर प्रकारचीं जीं गाणीं ऐकायला मिळतात तीं पुष्कळ वेळां अर्थशून्य व कंटाळवाण्या पुनरावृत्तीनें भरलेलीं आढळतात. तथापि त्यांचेंहि प्रकाशन होणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें उखाणे व म्हणी यांकडेहि लोकवाङ्मयाच्या संग्राहकांनीं लक्ष देणें जरूर आहे.

संवाद :

रुकमीन इचारी इट्टलाला ।
मी गोरी तुमचा रंग काओ काळा ।
इट्टल म्हने ग रुकमीन सुंदरी ।
मी ल्हान होतो नंदाच्या ग घरी ।
काजळ लागलं गालाला ।
नाइ झालं पुसायाला ।
गुंतलो भक्ताच्या काजाला ॥

* * *

वार :

सया मंगळवाराला मंगलमूरतीचा ।
अवो माज्या गरतीचा ॥
बुध ग वार आला । क्रिश्ण गोकुळी जलमला ॥
बुधवार झाला बस्तरवार आला ।
देव माजा येताळ नवसाला पावला ॥
बस्तरवार झाला शुकरवार आला ।

पांढरीच्या[1] लक्षुमीला कसा आयर[2] होत तिला ॥
शुकरवार झाला वार शनीवार आला
पांढरीच्या मारूतीला वल्या पड्यानं[3] पाणी घाला ॥
शनीवार झाला वार आइतवार आला ।
देवा माझ्या नाथाजीचा घोडा गुलालानं गर्त[4] झाला ॥
आईतवार झाला वार सोमवार आला ।
हातात बेल तांब्या भक्त माहादेवाला गेला ॥
सोमवार झाला वार मंगळवार आला ।
मी का आटवडा गाईला स्वामी इट्टल राहीला[5] ॥

* * *

द्रौपदी :

सावळा पांडुरंग दुर्पतीला मूळ गेला । दुर्पतीबाइला हिला बंदूजी नवता सखा[6] । सावळा पांडुरंग हारी । जोडला द्वारकाशी । कापली करंगुळी रक्ता भरली मुटी[7] । दुर्पतीबाईचं मन पायासाटीं[8] । कापली करंगुळी रक्ता लागलीया धार । दुर्पतीला रडू येतं माया फार । फाडीला पितांबर गंगनी झळकला । बंदू वळ्कला । इस्तागरलं[9] ताट घ्यावं इट्टल दोन घास । कोणती मनामदी आस । इस्तागरलं ताट काओ इट्टल जेवंना । याची कळंना भावना । सव्वा खंडीच्या भाकरी भीमसेनाचा एक घास । जेवन जेव रे बाळा कोणती मनामदी आस ॥

* * *

सत्यनारायण :

सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये एक ।
तेचं पुजयेला दसरत राजाचं लेक ॥
सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये दोन ।
तेचं पुजयेला दसरत राजाची सून ॥

सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये तीन ।
तेचं पुजयेला चांदीचं तामयन ॥
सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये चार ।
लिंबं नारळ आना सारं ॥
सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये पाच ।
पुडं पाऊन पोती वाच ॥
सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये सा वं ।
त्येला क्रिश्ण द्येव पावं ॥
सत्तीचा नारायेन माझ्या घरी हाये सात ।
घाला रांगुळी टाका पाट ॥
सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये आट ।
हळदी कुक्कानं भरा ताट ॥
सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये नऊ ।
फुलं मोगरा जाई ओऊ ॥
सत्तीचा नारायेन माज्या घरी हाये दहू [१०] ।
केळू काकड्या बाग लाऊ ॥

* * *

भक्त हनुमान :

कुटं बसते सीता, कुटं बसतो राम ।
कुटं बसतो माजा भक्त हनुमान ।
ओटी बसते सीता, पाटी बसतो राम ।
उबा न्हातो माजा भक्त हनुमान ॥
कशी न्हाते सीता, कसा न्हातो राम ।
कसा न्हातो माजा भक्त हनुमान ।
हंडा न्हाते सीता, गुंडा न्हातो राम ।
घंगाळ न्हातो माजा भक्त हनुमान ॥

काय लेते सीता, काय लेतो राम ।
काय लेतो माजा भक्त हनुमान ।
आबिर लेते सीता, बुक्का लेतो राम ।
गंद लेतो माजा भक्त हनुमान ॥
काय नेसते सीता, काय नेसतो राम ।
काय नेसतो माझा भक्त हनुमान ।
पातळ नेसते सीता, धोतर नेसतो राम ।
लंगुट नेसतो माजा भक्त हनुमान ॥
काय जेवते सीता, काय जेवतो राम ।
काय जेवतो माजा भक्त हनुमान ।
लाडू जेवते सीता, पेडा जेवतो राम ।
पर्साद जेवतो माजा भक्त हनुमान ॥

* * *

मुंबईचा डॉक्टर :

आइ माजं पोट दुकतय ग ।
ममइचा डाक्टर येतय ग ।
नाडी तपासून जातय ग ।
आइ मला बाजारात नेतय ग ।
फुलाचा गजरा देतय ग ।

* * *

संसाराचा मासला :

मी सांगते वायलं निगा । येगळं निघून सौंसार बगा ।
सौंसार करून शिनले भऊ । सासरा इकून आनले घऊ ।
सौंसार करून शिनले भारी । दीर इकले चारी ।
सौंसार करून शिनले किती । नंदा इकल्या चौघी जनी ।
सौंसार करून शिनले बाई । सेवटी इकली [१२]मथारीबाई ।
सौंसार करून शिनले पहा । पतीला इकून आनला चहा ॥

फुगडीचे उखाणे :

उखाणे म्हणजे पुष्कळदा यमकासाठीं केलेली निरर्थक रचना असते. तथापि कांहीं वेळा त्यांतहि व्यवहारज्ञान, पूर्वग्रह, मार्मिक उपहास इत्यादि सांपडतात.

ल्हाया मन ल्हाया दुरडीभर ल्हाया ।
लांब लांब केसाच्या गुजरिणी बाया ॥
अपु मन अपु तोळाभर अपु
सवतीच्या लेकराला किती मन जपु ॥
घसर फुगडी घसऱ्याची ।
कंबर मोडी सासऱ्याची ॥
ओटा मन ओटा चौकोनी ओटा ।
बामनाच्या पोरीचा झंपर मोटा ॥
टिकाचा गोंडा पाठीवर लोळे
प्रथमवराची बायको पायापाशी लोळे ।
पेट्याचा गोंडा पाठीवर लोळे ।
बिजवराची बायको मांडीवर लोळे ।
आंबाडीच्या भाजीला गरगटावं किती ।
काळ्या नवऱ्याला नटवावं किती ॥
लसणीची कांडी काइ सोलंना ।
दिमाखाची सवत माजी बोलंना ॥

* * *

म्हणी :

कामाची कुकडी, तीन जागी वाकडी.
हातनं होइना काइ, तोंड घेतं घाइ.
कामाची मैना, काइबी व्हइना.
काम नाइ घरीं, सांडून भरी.

खौट खोबरं, वशाळ[१३] गिराइक.
कोडग्या कोडग्याला लाज नाइ, आजचा कोडगा उद्याला नाइ.
आवसबाई तुज्याकडं, पूनीवबाई माझ्याकडं, भीक मागी चौकडं.
सौंसार केला घाइघाइ, म्हातारपणला काइच नाइ.
हलगीसंगं जा म्हणलं, तर हजामासंगं जाणार.
बुरथ्या गाईला माया भारी, चाटून चाटून वासरू मारी.
सहज पडं, दंडवत घडं.
ढुंगणामागं आरी, चांभार पोर मारी.
खादाड्याला चव नाइ, आळशाला इसावा नाइ.
घरच्या चिंचंनं आंबले दांत, शेजारणीचा दहीभात.
उचलली जीब लावली टाळ्याला, घेतला येळकोट गेली बाळ्याला[१४].

* * *

# टीपा आणि स्पष्टीकरण

## १

(१) सोलापूरचें ग्रामदैवत सिद्धेश्वर. (२) सोलापूरच्या प्रसिद्ध किल्ल्याचें बांधकाम सुरू झालें तेव्हां बुरुज पुन्हां पुन्हां ढासळूं लागल्यानें एका ज्योतिष्याच्या सांगण्यावरून एका गरोदर स्त्रीला जिवंत गाडण्यांत आलें व मग बुरुजाचें काम पूर्ण झालें. वीरशैव लिंगायत समाजांतल्या दर्गो-पाटील नांवाच्या घराण्यांतील ही स्त्री होती असें म्हणतात. ओवींत मात्र गरोदर स्त्रीचा उल्लेख नसून बाळंतिणीचा आहे व तोच बरोबर असावा. कारण या बुरुजाला आजहि बाळंतिणीचा बुरुज असेंच नांव आहे. (३) ही गिरणी इ. स. १८९८ मधें सुरू झाली. गिरणीचें नांव 'धी राजाबहादूर नरसिंगजी मिल' असें आहे. तथापि सोलापूरचे सुप्रसिद्ध नगरशेठ कै. अप्पासाहेब वारद हे या गिरणीचे एक मालक होते व त्यावरून ही गिरणी अजूनहि जुन्या लोकांत वारद गिरणी याच नांवानें ओळखलीं जाते. (४) सोलापूर जिल्ह्यांतल्या भक्तांना जेजुरी फार लांब पडते म्हणून जेजुरीचा खंडोबाच सोलापूरला लागून असलेल्या बाळें या गांवीं येऊन राहिला आहे. असें सांगतात. (५) उग्र. तुळजापूरची भवानी आणि मार्डीची यमाई या एकच. तुळजापुरीं तिला तुकाई म्हणतात. मार्डीच्या देवीचें रूप अतिशय उग्र असल्यानें तें सौम्य करण्यासाठीं अर्धी मूर्ति जमीनींत बुजवून टाकली आहे. ही मूर्ति संपूर्ण बाहेर होती तेव्हां इतकी उग्र दिसे कीं, गाभण जनावर समोरून गेलें तर भयानें वीत असें, असें म्हणतात. (६) सांगोलें गांव एके काळीं इतकें संपन्न व समृद्ध होतें कीं, त्याला सोन्याचें सांगोलें असें नांव पडलें होतें. पेशवाईत होळकरांनीं लुटल्यापासून त्याची परिस्थिति खालावली असें म्हणतात. (७) संस्थानें विलीन होण्यापूर्वीं मंगळवेढें सांगली संस्थानांत होतें. आतां तें सोलापूर जिल्ह्यांतील तालुक्याचें गांव आहे. 'कळसामागच्या कलावंतिणी' या उल्लेखावरून पूर्वीं देवळामागें कलावंतिणींचा नाच होत असावा. (८) लोककथेप्रमाणें बार्शीचा भगवंत पंढरपूरच्या विठोबाहून जुना. अंबरीष–दुर्वास यांच्या कथेशीं बार्शीचा संबंध आहे. विष्णूचें सुदर्शन मागें

लागल्यावर दुर्वासाला अंबरीषाकडेच परत जावें लागलें, व अंबरीषानें चक्राची स्तुति करून तें थांबवलें. सुदर्शन जिथें पडलें तिथें तळें निर्माण झालें व आज बार्शी इथें तेंच सुदर्शन तळें म्हणून प्रसिद्ध आहे. देवळाजवळ दुर्वासाची समाधि आहे. ही कथा द्वादशीला घडली म्हणून गांवाचें नांव बार्शी. भगवंताच्या मूर्तीचीं दोन वैशिष्ट्यें आहेत. एक म्हणजे, भगवंतापुढें अंबरीष गुडघे टेकून बसलेला असून भगवंतानें त्याच्या मस्तकावर हात ठेवला आहे. दुसरें म्हणजे, भगवंताचीं मूर्ति ज्या शिळेची आहे त्याच शिळेंत भगवंताच्या पाठीशीं टेकून उलट दिशेस तोंड केलेली लक्ष्मीची मूर्ति आहे. म्हणजे ही मूर्ति समोरून विष्णूची तर पाठीमागून लक्ष्मीची आहे. सोंवळ्यानें भगवंताच्या उजव्या हातानें जाऊन लक्ष्मीचें दर्शन घ्यावें लागतें. म्हणूनच हा भगवंत बायकोला पाठीवर वागवणारा बाईलवेडा! बार्शी हें गांव सोलापूरच्या वायव्येस चाळीस मैलावर आहे. ( ९ ) रंभाजी निंबाळकर. हा शाहूच्या पदरीं होता. परंतु त्यानें ती चाकरी सोडली. हैद्राबाद राज्याचा संस्थापक पहिला निजाम–उल्–मुल्क यानें त्याला रावरंभा हा किताब देऊन आपल्या पदरीं ठेवलें. निजाम–उल्–मुल्काच्या पदरीं असतांना त्यानें गाजवलेल्या पराक्रमाबद्दल त्याला पुण्याजवळ जहागीर मिळाली. इ. स. १७२३ मध्यें निजाम स्वतंत्र झाल्यावर सोलापूर, करमाळें वगैरे भाग त्याच्या ताब्यांत गेला. इ. स. १७२७ मध्यें रावरंभा निंबाळकराला पुण्याजवळच्या जहागिरीच्या मोबदल्यांत करमाळें प्रांत मिळाला. असें म्हणतात कीं, निजामाच्या राज्यांत ( निजामासह ) तीनच पुरुष होते. रावरंभा हा त्यांतला एक. करमाळ्याच्या आग्नेयेस असलेलें अंबाबाईचें प्रेक्षणीय देऊळ या निंबाळकरानेंच साडेसतरा लाख रुपये खर्चून बांधलें. ( १० ) रावरंभा निंबाळकरानें करमाळ्याचा किल्ला बांधण्यास सुरुवात केली व त्याचा मुलगा जानोजीराव यानें तो पुरा केला. ( ११ ) करमाळ्याजवळ एका माळावर करीम मौला या साधूचा दर्गा आहे. या माळाला मौलालीचा माळ म्हणतात. या करीम मौलाच्या नांवावरूनच गांवाला करमाळा–करमाळें हें नांव पडलें असें सांगतात. ( १२ ) नरोटी. करमाळें गांव पाण्याच्या टंचाईनें नेहमीं त्रस्त असतें. ( आतां पाण्याची सोय होत आहे म्हणतात. ) उन्हाळ्यांत विहिरी इतक्या कोरडया होतात कीं, नारळाच्या करवंटीनें पाणी खरडून घ्यावें

लागतें. ‘ करमाळं आणि पाण्यावांचून तरमाळं ’ अशी गांवांत म्हणच पडली आहे. किल्ल्यांतल्या एका विहिरीला कारंजे म्हणतात. ( १३ ) करमाळ्यापासून चार-पांच मैलावर असलेलें, सीना व कानवळा या नद्यांच्या संगमावरील महादेवाचें स्थान. याला संगमेश्वर किंवा संगोबा म्हणतात. ओवींतला भीमेचा उल्लेख चुकीचा आहे. भीमा आणि सीना यांचा संगम कुंडल या गांवीं झालेला आहे. या गांवाच्या पलीकडे पूर्वेस अक्कलकोट आहे. ( १४ ) दर्गा. औरंगजेबाच्या मुलीचा बेगमपूर इथला दर्गा. याला बेगमेचा दर्गा असें म्हणतात. घोडेश्वर या गांवाजवळ हा दर्गा बांधल्यावर आसपास बेगमपूर या नांवानें गांव वसलें, व घोडेश्वर बाजूला पडलें. बेगमपूर गांवचा पोस्टाचा शिक्का मात्र घोडेश्वर याच नांवाचा असतो. ( १५ ) बेगमपूर इथला परमहंसस्वामींचा मठ. हे दत्तसंप्रदायांतले प्रसिद्ध योगी औरंगजेबाच्या काळांत होऊन गेले. स्वामींचा मठ व बेगमेचा दर्गा दोन्ही भीमेच्या अगदीं कांठावर असून दोन्हींच्या मधून नदीला जाण्याचा रस्ता आहे. ( १६ ) भीमा नदीच्या कांठावर असलेल्या माचणूर या गांवीं सिद्धेश्वराचें देऊळ उंचवटयावर आहे व खालीं पाण्याजवळ जटाशंकराचें देऊळ आहे. ( १७ ) माचणूर इथल्या सिद्धेश्वराच्या देवळाच्या पलीकडे लागून असलेलें ब्रह्मपुरी हें गांव. सिद्धेश्वराच्या देवळाचे पंच माचणूरचे असतात व पुजारी ब्रह्मपुरीचे असतात. माचणूर हें गांव सोलापूरच्या नैर्ऋत्येला सुमारें पंचवीस मैलांवर आहे. माचणूर-ब्रह्मपुरी भीमेच्या उजव्या कांठावर असून बेगमपूर डाव्या तीरावर आहे. ( १८ ) सिद्धेश्वर व परमहंसस्वामी यांच्या कथा पुढीलप्रमाणें आहेत. ( अ ) सोन्नलगी ( आजचे सोलापूर ) या गांवीं मार्डी मुद्दगौडा नांवाचे पाटील होते. त्यांच्या भार्येचें नांव सुग्गलादेवी. इ. स. ११४० च्या सुमारास रेवणसिद्ध नांवाच्या महान् शिवयोग्याच्या प्रसादानें या दांपत्याच्या पोटीं सिद्धेश्वर म्हणजेच सिद्धरामेश्वर यांचा जन्म झाला. यांच्या जन्मानंतर सोन्नलगीची भरभराट होऊन सोळा खेडयांचा त्यांत समावेश झाला व शहरास सोलापूर हें नांव पडलें. माचणूर-ब्रह्मपुरी इथें याच सिद्धेश्वरांचें देऊळ आहे. औरंगजेब दक्षिणेंत आला तेव्हां इ. स. १६९५ ते १७०० पर्यंत त्याच्या लष्कराचा तळ ब्रह्मपुरी इथें होता. त्याच्या लष्करानें हें देऊळ नदीच्या पाण्यांत बुडवून टाकण्यासाठीं देवळापुढें मोठेमोठे खड्डे खणून

नदीचा प्रवाह वळवण्याचा प्रयत्न केला, परंतु नदीच्या पाण्यानें देवळास कांहीं न होतां लष्कराचेंच नुकसान झालें. इ. स. १७०० मध्यें मुसलमानी सैन्याचा तळ इथून उठला. हे खड्डे अजून माचणूर येथें दाखवतात. ( ब ) औरंगजेबाच्या सैन्याचा तळ ब्रह्मपुरी इथें होता त्याच काळांत नदीच्या डाव्या तीरावरील घोडेश्वर या गांवीं ( वेगमपूर ) परमहंसस्वामी नांवाचे दत्तसंप्रदायी सिद्ध पुरुष राहत होते. यांचा पूर्ववृत्तांत अज्ञात आहे. असें म्हणतात कीं, हे स्वामी रोज उजव्या तीरावरील सिद्धेश्वराच्या देवळांत स्वतः सिद्धेश्वराशींच सोंगट्या खेळायला जात असत. नदीच्या पाण्यावर धाबळी टाकून त्यावरून शिष्यांसहवर्तमान हे स्वामी पलीकडल्या तीराला जात. हा चमत्कार औरंगजेबाच्या कानावर गेला तेव्हां स्वामींची परीक्षा पाहण्यासाठीं त्यानें स्वामींना दरबारांत बोलावून घेतलें व हुजऱ्याकडून गोमांस ठेवलेलें ताट गुलाबाचीं फुलें आहेत असें सांगून नजर केलें. स्वामींनीं कमंडलूंतलें पाणी ताटावर शिंपडून हुजऱ्यालाच ताटावरचा रुमाल काढण्यास सांगितलें. हुजऱ्यानें रुमाल काढला तर ताटांत खरोखरच गुलाबाचीं फुलें निघालीं. मांसाचें रूप ( नूर ) बदललें म्हणून या गांवाला मासनूर–माचणूर नांव पडलें असें म्हणतात.

हा चमत्कार करून स्वामी तडक परत निघाले. आपल्याकडून कांहीं दान घ्यावें म्हणून औरंगजेबानें स्वामींची विनवणी केली. परंतु त्यांनीं ती मान्य केली नाहीं. तेव्हां औरंगजेबानें त्यांचे शिष्य बाळकृष्णबुवा यांच्यापाशीं पांच गांवांच्या जहागिरीच्या पांच सनदा दिल्या. इकडे स्वामी नदीवर जाऊन पाण्यार धाबळी टाकून शिष्याची वाट पाहत होते. बाळकृष्णबुवांनीं जहागिरीच्या सनदा घेतल्या आहेत याची स्वामींना कल्पना नव्हती, किंवा कल्पना असूनहि ते कांहीं बोलले नाहींत. धाबळी नदीच्या मध्यावर येतांच डळमळू लागली तेव्हां तुझ्याजवळचें विष नदींत फेकून दे नाहींतर आपण तीराला पोंचणार नाहीं असें सांगितलें. शिष्याचा जीव जहागिरींत अडकला असल्यानें तो सनदा फेकून देण्यास तयार होईना. परंतु धाबळी फारच डळमळू लागलेली पाहून त्यानें एक एक सनद नदींत फेकून देण्यास सुरुवात केली. तीरावर येईपर्यंत सर्व सनदा फेकून दिल्या होत्या. परंतु एक सनद धाबळीच्या दशीला अडकून कोरडीच आली. शिष्याचा जीव अजूनहि जहागिरींतच

आहे असें पाहून तेवढी एका गांवाची जहागीर घेण्यास त्यास अनुज्ञा देऊन आणि जहागीरीचा पैसा अन्नदानांत खर्च करण्यास सांगून स्वामींनीं समाधि घेतली. ही समाधि बेगमपूरच्या दक्षिणेला एक मैलांवर भीमेच्या कांठीं आहे. जहागिरीच्या गांवाचें नांव आरबळी असून तें बेगमपूरच्या दक्षिणेला चार मैलांवर आहे. बाळकृष्णबुवांनीं जहागीर घेतली तरी आपल्यामुळें स्वामींना लवकर समाधि घ्यावी लागली ही गोष्ट त्यांच्या मनाला लागली होती. त्यांनीं लवकरच आपले शिष्य पांडुरंगबुवा यांच्या स्वाधीन जहागीर करून दत्ताचें सुप्रसिद्ध स्थान गाणगापूर इथें समाधि घेतली. जहागीर गुरूकडून शिष्याकडे अशी चालत येत असे. जहागिरीवर येणाऱ्या शिष्याला गृहस्थाश्रम स्वीकारतां येत नसे. परंतु या नियमामुळें पुढें मागें अनाचार माजूं लागेल असें वाटून ( किंवा तो सुरू झाला म्हणून ) १९ व्या शतकांत गोविंदबुवा या जहागिरदारांनीं आपले शिष्य पांडुरंगबुवा यांना गृहस्थाश्रम स्वीकारण्याची अनुज्ञा दिली. पांडुरंगबुवा गुरु गोविंदबुवा यांना दोन पुत्र झाले. थोरले गोविंदबुवा आणि धाकटे माधवबुवा. याच पिढींत जहागिरीची वांटणी झाली. थोरले गोविंदबुवा इ. स. १९४५ मधें निधन पावले. त्यांना चार मुलें आहेत. सध्यां मठाची व उत्सवाची व्यवस्था दोन्ही घरांकडे आहे.

परमहंसस्वामींच्या नांवानें आरबळी या जगागिरीच्या गांवीं दर गुढी पाडव्याला नवें निशाण लावण्यांत येतें. बेगमपूरच्या मठांत दरवर्षीं वैशाख शुद्ध दशमीस पुण्यतिथीनिमित्त भंडारा होतो व हा उत्सव चतुर्थी ते द्वादशी असा नऊ दिवस चालतो. बेगमपूर हें गांव सोलापूरच्या वायव्येस पंचवीस मैलांवर आहे. स्वामींच्या मठासमोरच बेगमेचा ( औरंगजेबाच्या मुलीचा ) दर्गा आहे.

( १९ ) नळदुर्ग हें उस्मानाबाद जिल्ह्यांत सोलापूरहून ३० मैलावर हैद्राबादच्या वाटेवर आहे. एके काळीं तें वैभवसंपन्न शहर होतें. इथला किल्ला सुप्रसिद्ध आहे. किल्ल्यांतल्या उपली बुरुजावरून खाली उतरल्यावर पाणीमहाल लागतो. हा पाणीमहाल म्हणजे बोरी किंवा बोरणा या नदीवर बांधलेला एक मोठा पूलच आहे. पुलाला पाणी जाण्यासाठी तीन मोठ्या मोऱ्या केल्या आहेत. अगदीं तळाशीं असलेल्या मोरीला पाताळमोरी म्हणतात. तिच्यावरच पुलाच्या आंतल्या भागांत पाणीमहाल आहे. हा महाल आदिलशाहींत बांधलेला असावा असें म्हणतात. महाल अशा कुशलतेनें बांधला

आहे कीं, नदीस महापूर आला असतां, पुलावरून आणि पाणीमहालावरून पाणी जातें; परंतु महालांत बसलेल्या माणसाला उपसर्ग पोंचत नाहीं. पाताळमोरी-शिवाय गंधीमोरी व लकडमोरी अशा दोन मोऱ्या आहेत. ( २० ) पंढरपूरच्या देवळांत विठ्ठल व रुक्मिणी यांच्या मूर्ति एकत्र नाहींत. दोघांचीं स्वतंत्र देवळें आहेत. या स्वतंत्रपणाची ही मीमांसा. ( २१ ) माचणूर ( २२ ) ओझेंवाडी. ( २३ ) माणनदी ( २४ ) मुंडवी गांव ( २५ ) दिंडीची विसावा घेण्याची जागा ( २६ ) सोंवळ्याची ( २७ ) पाय ( २८ ) शालूसारखें भरजरी वस्त्र ( २९ ) ओढीनें ( ३० ) जोडीनें ( ३१ ) खडावा ( ३२ ) लहान गुंड, भांडें ( ३३ ) नीर ! ( ३४ ) देवळाच्या कांहीं पायऱ्या चढून गेल्यावर एक जुनाट झाड आहे. ( ३५ ) देवळांत बसायच्या जागेला उद्देशून हा शब्द वापरलेला दिसतो. ( ३६ ) माचणूरच्या सिद्धेश्वराजवळचा जटाशंकर ( ३७ ) माचणूरचा सिद्धेश्वर. चंद्रभागेला पूर आल्यावर सोळखांबी मंडपालाहि पाणी लागतें किंवा देवळांत शिरतें हें सारें वर्णन अतिशयोक्त आहे.

## २

( १ ) यवन. ही पाठांतराची चूक नव्हे. उच्चारविशेष आहे. ( २ ) उडाली हौस. ही पाठांतराची चूक दिसते. ( ३ ) दुर्गा देवीच्या दुष्काळाचा उल्लेख चुकीचा आहे. हा दुष्काळ इ. स. १३९६ ते १४०७ या काळांत पडला होता. या ठिकाणीं १४६० सालच्या दुष्काळाचा उल्लेख हवा. हा दुष्काळ दामाजीपंतांचा किंवा पंतांचा दुष्काळ म्हणूनच ओळखला जातो. ( ४ ) व्यापाऱ्यांना. ( ५ ) हातांनीं ! ( ६ ) विनंती ! ( ७ ) समृद्ध. ( ८ ) दुष्काळ पडलेला असूनहि देव धष्टपुष्ट दिसतो आहे त्या अर्थीं त्याच्या-जवळ धान्य असलें पाहिजे म्हणून लोक त्याच्याकडे जातात, व धान्य कांहीं आमच्या घरीं पिकत नाहीं, ज्यांनीं सांठविलें असेल त्यांच्याकडे जा असें सांगून देव लोकांना दामाजीपंताकडे घेऊन जातो. पुढें दामाजीपंतांवर संकट आल्यावर आपल्यामुळेंच हें संकट ओढवल्यानें दामाजीची आपण सुटका केली पाहिजे असें वाटून देव त्यांची सुटका करतो ही कल्पना नवीन वाटते. संपूर्ण घटनेला तर्कशुद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न जाणवावा. ( ९ ) धान्य सांठवण्याचें बळद. ( १० ) सरकारी धान्य मापणारा. ( ११ ) दामाजी-

पंतांनीं ज्या दोन बळदांत धान्य ठेवलें होतें त्या बळदांचीं नांवें. मंगळवेढ्यांत ही जागा अजून दाखवतात. ( १२ ) सुवर्णमुद्रा. ( १३ ) सहेल्यांनो-सख्यांनो ( १४ ) करा. ( १५ ) युद्धाला. ( १६ ) रक्ताचे ( १७ ) हळकुंड. ( १८ ) साहाय्याला. ( १९ ) देव. ( २० ) ! ( २१ ) बसे ! ( २२ ) मुंडवळ्या. ( २३ ) धामणगांवचा सुप्रसिद्ध भगवद्भक्त माणकोजी बोधला. हा जातीनें शूद्र होता व त्याचें आडनांव जगताप होतें. हा तुकारामाचा समकालीन होता असें महिपतीनें म्हटलें आहे. अर्थात् नामदेवाच्या लग्नांत आहेर घेऊन येणारा म्हणून याचा असलेला उल्लेख काल्पनिक दिसतो. ( २४ ) भाऊबींजेला. ( २५ ) पुष्कळ. ( २६ ) गुंग. ( २७ ) अदृश्य. ( २८ ) देव.

## ३

( १ ) लावीन = देईन. बुक्क्या लावणें म्हणजे बुक्के मारणें. ( २ ) सावकाश, काळजीपूर्वक. ( ३ ) शिळा. ( ४ ) ढुंगणाला पाय लावून पळा. ( ५ ) कटकी मेवा = नारळाचा मेवा. ( ६ ) सुपाच्या कोपऱ्यांत ( ७ ) उरल्या सुरल्या ओव्या ( ८ ) कोमेजला ( ९ ) मेंदीचें बी. दृष्ट काढण्यासाठीं हें जाळतात. ( १० ) प्रशस्त ( ११ ) खोटा, दडपून ( १२ ) वेढला ( १३ ) दीन म्हणजे इस्लाम. इस्लाम धर्माची थोरवी प्रगट करून गेला.

## ४

( १ ) जोंधळ्याची एक जात. ( २ ) गाडींत मावेल इतक्या कडब्याला. अर्थात् ही अतिशयोक्ति आहे. ( ३ ) उफणणी करण्यासाठीं उभें केलेलें माचाड. ( ४ ) चारी कोपऱ्यांत ( ५ ) जमीनदाराला किंवा लष्करी अधिकाऱ्याला शोभेल असा मोठा व्याप, सरंजाम. ( ६ ) सांठवणीला ( ७ ) चारीठाव. उत्तम जेवण. ( ८ ) मोठा वाडा. ( ९ ) मोटेची धांव. बैलांना सावली मिळावी म्हणून आंब्यासारखी झाडें मुद्दाम धांवेच्या कडेला लावतात. ( १० ) शेती; वतनी जमिनीचा सारा. ( ११ ) भारी कापडाची. ( १२ ) चरक. ( १३ ) कमी दर्जाची.

## ५

( १ ) गांवच्या ( २ ) आहेर ( ३ ) कपडयानें ( ४ ) माखून निघाला. ( ५ ) विठ्ठलाच्या राही या बायकोला ( ६ ) सख्खा ( ७ ) मूठ ( ८ ) पाहण्यासाठीं ( ९ ) वाढलें ( १० ) दहा ( ११ ) आठ नऊ वर्षांपूर्वी असलेंच एक गाणें बिलिमोरा इथें एका गुजराती कामकरी बाईकडून ऐकल्याचें स्मरतें. मात्र, त्या गाण्यांत हनुमानाऐवजीं सत्यनारायण असें नांव होतें. ( १२ ) म्हातारी = सासू. ( १३ ) ओशाळ, शरमिंधें ( १४ ) सोलापूरजवळचें बाळें हें खंडोबाचें प्रसिद्ध स्थान.

* * *

: परिशिष्ट

# महाराष्ट्र साहित्य परिषद्, शाखा सोलापूर.

## परिचय : १९४१ – १९६०

१९४१ सालीं सोलापूर येथें महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें पंचविसावें रौप्यमहोत्सवी अधिवेशन झालें. श्री. वि. स. खांडेकर हे अध्यक्ष, शेठ रतनचंद हिराचंद दोशी हे स्वागताध्यक्ष, ‘ सोलापूर समाचार ’चे संपादक श्री. बाबूराव जक्कल हे कार्याध्यक्ष आणि श्री. शं. गो. पटवर्धन हे एक प्रमुख चिटणीस होते. संमेलनानंतर स्वागतमंडळानें महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सोलापूर शाखेची स्थापना केली. शाखेचे पहिले अध्यक्ष श्री. बाबूराव जक्कल होते. त्यांच्या निवृत्तीनंतर दयानंद कॉलेजांतील मराठीचे प्राध्यापक नामवंत कवि डॉ. वि. म. कुलकर्णी हे अध्यक्ष झाले व त्यांच्या निवृत्तीनंतर आतां श्री. शं. गो. पटवर्धन हे अध्यक्ष आहेत.

स्वराज्य काळांतील पहिलें महाराष्ट्र साहित्य संमेलन पुणें येथें आचार्य जावडेकर यांच्या अध्यक्षतेखालीं १९४९ सालीं झालें. सोलापूर-शाखेनें त्याच वर्षीं दरसाल ‘ जिल्हा साहित्य संमेलन ’ भरविण्याचा संकल्प केला व तो आजतागायत अखंड चालू आहे. १९५९ सालीं प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखालीं मिरज येथें झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनांत आमच्या या उपक्रमाचें अभिनंदन करण्यांत आलें, आणि सोलापूरच्या उमक्रमाचें महाराष्ट्रांत सर्वत्र अनुकरण व्हावें असा, स्वतंत्र ठरावाच्या द्वारें आदेश देण्यांत आला.

सोलापूर-शाखेनें आजपर्यंत पुढील गांवीं जिल्हा साहित्य संमेलनें भरविलीं. सोलापूर, बार्शी, पंढरपूर, माढें, मोहोळ, अक्कलकोट, सांगोलें, मंद्रूप. यंदाचें संमेलन करमाळें येथें भरत आहे. याखेरीज, पुढील ठिकाणीं विभाग संमेलनें भरविण्यांत आलीं. कुर्डूवाडी, मंगळवेढें आणि येडशी. हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरला असून दिवसेंदिवस जिल्ह्यांत सर्वत्र साहित्यिकांचा आणि

कार्यकर्त्यांचा वाढता पाठिंबा मिळत आहे. चालू संमेलनापासून शाखेनें स्थानिक लोकसाहित्याच्या प्रकाशनाला आरंभ केला असून याहि कार्याला उत्तरोत्तर वाढतें यश मिळेल अशी आशा आहे.

**विद्यमान कार्यकारी मंडळ :**

शाखेच्या विद्यमान कार्यकारी मंडळाचे सभासद पुढीलप्रमाणें आहेत—

अध्यक्ष : श्री. शं. गो. पटवर्धन

उपाध्यक्ष : डॉ. दु. का. संत
डॉ. कृ. शे. मार्डीकर

कार्याध्यक्ष : श्री. शा. ब. कुलकर्णी

कोषाध्यक्ष : श्री. प. बा. आळंदकर

चिटणीस : श्री. ज. रं. ललित

सभासद : डॉ. वि. म. कुलकर्णी, डॉ. यू. म. पठाण, श्री. द. मो. दामले, श्री. पं. मा. कामतकर.

**शं. गो. पटवर्धन,**
अध्यक्ष

**शा. ब. कुलकर्णी,**
कार्याध्यक्ष

REFBK-0011228
REFBK-0011228